

# प्रेस नोट

दिनांक ०३/०३/२०२१

**गुजरात येथील ३ घरफोडीच्या गुन्हयात फरारी असलेल्या आरोपीतांना कोनगांव पोलीस ठाण्यात अटक करून ३ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणुन त्याचेकडून ४४,०५,०००रू. माल हस्तगत केला.**

कोनगांव पोलीस ठाणे, भिवंडी गुन्हा रजि नं. I ३८/२०२१ भा.द.वि.कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ मधील फिर्यादी नामे रितेश उत्तमचंद्र शहा वय ४७ वर्षे, व्यवसाय– व्यापार, रा. सिंफनी बिल्डींग, ३ रा माळा, फ्लॅट नं. ११, मलबार हिल मुंबई यांचे मालकीचे कपील रेयॉन (इंडीया) प्रा.लि. सर्व्हे नं. ६/८ सपना इंडस्ट्रीयल इस्टेट, सरवली, ता. भिवंडी या कंपनीच्या पाठीमागील लोखंडी शटर कोणीतरी अज्ञात चोरटयांनी उचकटून लोखंडी जाळी कापून त्यावाटे आत प्रवेश करून एअरजेट पिकानॉल सुमम लुम मशीन मधील एकूण १८,००,०००/– रू किंमतीचे एकूण ७२ इलेक्ट्रीक कार्ड घरफोडी चोरी करून नेले होते. त्याबाबत कोनगांव पो.स्टे. येथे दिनांक ०८/०२/०२१ रोजी २०:१६ वा. गुन्हा दाखल आहे. तसेच त्यांचे बाजुच्या के. जी. सिल्क मिल्स टेक्सस्टाईल कंपनी, सपना कंम्पाउंन्ड, सरवली, ता. भिवंडी या कंपनीमध्ये अज्ञात चोरटयांनी प्रवेश करून सोमेट कंपनीच्या लुम मशीन मधील २४,००,०००/– रू. किंमतीचे एकूण १२० इलेक्ट्रीक कार्ड चोरी करून नेले होते. त्याबाबत कोनगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं. I ३६/२०२१ भा.द.वि. कलम ३८० प्रमाणे दिनांक ०४/०२/२०२१ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गणपतराव पिंगळे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/ अभिजीत पाटील व तपास पथकाचे अंमलदार यांनी गोपनिय माहिती व तांत्रिक तपास करून सदर गुन्हयात आरोपी नामे १) कमलेश माताप्रसाद मिश्रा वय ३८ वर्षे, व्यवसाय– बेकार, सद्या रा. जय माताजी चाळ, रूम नं. ०२, सावेगांव, दिवा, जि. ठाणे मुळ रा. ग्राम– मरगुपूर, पो. छापर, ता. लंम्बुवॉ, जि. सुलतानपूर, राज्य– उत्तरप्रदेश २) जितेंद्र उमा महतो वय ३८ वर्षे, व्यवसाय– बेकार, रा. हसनपूर, नया टोला, ता. बरौली, जि. गोपालगंज, राज्य– उत्तरप्रदेश यांना अटक करून त्यांचेकडून खालील ३ गुन्हे उघडकीस आणुन एकूण ४४,०५,०००/– रू. किंमतीचे लुममशीने इलेक्ट्रीक कार्ड हस्तगत करण्यात आलेले आहेत. सदरचे आरोपीत हे सराईत गुन्हेगार आहेत.

१) कोनगांव पो.स्टे. गुन्हा रजि नं. I ३६/२०२१ भा.द.वि. कलम ३८० प्रमाणे

२) कोनगांव पो.स्टे. गुन्हा रजि नं. I ३८/२०२१ भा.द.वि. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ प्रमाणे

**आरोपीत यांचेकडून जप्त केलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालीलप्रमाणे.**

१) १४,७५,०००/–रू. किंमतीचे एअरजेट पिकानॉल सुमम लुममशीनचे पॅनल मधील CBMP, ABSD-A, ABSD-B, CBIO असे एकूण ५९ इलेक्ट्रीक कार्ड जुवाकिंसु. **(कोनगांव पो.स्टे. गुन्हा रजि नं. I ३८/२०२१ भादविक ४५४, ४५७, ३८०,३४ मधील)**

२)२४,००,०००/– रु. किंमतीचे सोमेट कंपनीचे लुममशीनचे पॅनलमधील MCS, MCU, EG1, EG2, I02, DXX, AUX असे एकूण १२० इलेक्ट्रीक कार्ड जुवाकिंसु. **(कोनगांव पो.स्टे. गुन्हा रजि नं. I ३६/२०२१ भादविक ३८० मधील)**

३) ५,३०,०००/– रू. किंमतीचे अरटेज फॅब्स लि. कंपनी, सोनाळे येथील लुममधील एकूण ५३ इलेक्ट्रीक कार्ड जुवाकिंसु. **(भिवंडी तालुका पो.स्टे. हददीतील अरटेज फॅब्स लि. कंपनी, सोनाळे येथील)**

**अटक आरोपी नामे जितेंद्र जितेंद्र उमा महतो हा गुजरात येथील खालील गुन्हयात पाहिजे आरोपी आहे.**

१) पलसाना पो.स्टे. गुन्हा रजि नं. १३६/२०१९ भादविक ४५७, ३८०, ११४ प्रमाणे

२) ओलपाडा पो.स्टे. गुन्हा रजि नं. १२०/२०१९ भादविक ४५७, ३८०, ११४ प्रमाणे

३) उमरगांव पो.स्टे. गुन्हा रजि नं. ०९/२०१३ भादविक ४५४, ४५७, ३८० प्रमाणे

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त मा.श्री. विवेक फणसाळकर, ठाणे शहर, पोलीस सह आयुक्त मा.श्री. सुरेश मेकला, ठाणे शहर, अपर पोलीस आयुक्त, प.प्रा.वि. ठाणे मा. श्री. अनिल कुंभारे, पोलीस उप आयुक्त, परि–, भिवंडी श्री. योगेश चव्हाण, सहा. पोलीस आयुक्त, पूर्व विभाग, भिवंडी श्री. प्रशांत ढोले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गणपतराव पिंगळे, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री. राजेंद्र पवार यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सपोनि/अभिजीत पाटील, पोउपनि/पराग भाट, सपोनि/किरण वाघ, सपोउपनि/वामन सुर्यवंशी, पोहवा/ राजेश शिंदे, पोहवा/संतोष मोरे, पोना/संतोष पवार, पोना/विनायक मासरे, पोशि/नरेंद्र पाटील, पोशि/गणेश चोरगे, पोशि/कृष्णा महाले, पोशि/अविनाश पाटील, पोशि/अशोक ढवळे, पो.शि.विजय ताठे यांनी केलेली असुन सदर गुन्हयांचा तपास सपोनि/अभिजीत पाटील हे करीत आहेत.

CS Scanned with CamScanner